# MT- 162

Seat No. | | | | | | |

**2014 .... .... 1100**

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - II

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

**प्र.1. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

1) आनंदवनाच्या निर्मितीआधी बाबांनी ..........

अ) सरकारला पत्र लिहिले. ब) वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला.

क) कडक उपवास केला.

2) न बापका डर, न माँका डर, ..........

अ) बेटा बना कलेक्टर. ब) बेटा बना व्हॉलेन्टियर. क) बेटा बना मॅनेजर.

3) एकाच्या पाठोपाठ दुसरं, तिसरं ... नजर पाहू शकेल एवढी ..........

अ) शिखरंच शिखरं ! ब) डोंगरंच डोंगरं ! क) पर्वतंच पर्वतं !

4) कारण माझा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच ..........

अ) मोठे ज्ञानी होतात. ब) बुद्धीवंत होतात. क) श्रीमंत होतात.

**प्र.1. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

1) रविवर्मा त्या .......... व्यक्तिमत्त्वाकडे भारल्यासारखा पाहत होता.

(भरदार, तेजस्वी, तेजःपुंज)

2) ते त्यांचं चालत आलेलं .......... आहे.

(शास्त्र, शस्त्र, अस्त्र)

3) बाबूजींसाठी कुणाकडेही .......... नव्हता.

(पैसा, वेळ, टाइम)

**प्र.1. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) नारायण सुर्वे (मास्तर) यांनी कोणावर श्रद्धा ठेवली ?

2) पन्हाळ्याचा दरगाह कोणत्या बादशहाने बांधला आहे ?

3) लेखकाच्या मते निसर्गाला जाती तसेच काय मंजूर नाहीत?

**प्र.2. अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

1) ''भारतीय आई काय किंवा अमेरिकन आई काय, मुलांचे कौतुक दोघींनाही सारखेच प्रिय असते की !''

2) ''आपण कुणाचे कुणीतरी नातेवाईक अशी ओळख अर्थपूर्ण, की आपण स्वतःच अमुक अमुक हे अर्थपूर्ण आणि महत्त्वाचे ?''

**प्र.2. आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) सुर्वे यांना सोव्हिएत रशियाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल कृष्णाबाई कोणता विचार व्यक्त करतात ?

2) आनंदोत्सव साजरे करताना कोणत्या मर्यादा पाळणे आवश्यक आहे ?

3) 'ईद' या सणाच्या दिवशी लेखिका आशा आपराद यांच्या घरी वातावरण कसे असे ?

4) निसर्गाला नित्यनव्याचा सोस असतो, असे का म्हटले आहे ?

5) रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावांच्या पोशाखाचे वर्णन करा.

**प्र.3. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

1) संत नरहरी सोनार 'कृपा कर' असे कोणाला सांगतात?

2) कवयित्री आश्लेषा महाजन यांना जीवन कसे वाटते ?

3) वाऱ्यावरती काय विरून जात आहे ?

**प्र.3. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

1) तिथे अन्न होऊन ठाकेल .......... (घनश्याम, राम, श्याम)

2) साऱ्या नद्यांचे .......... बदलावेत. (प्रवाह, वेग, मार्ग)

3) सावरीत जखम खोल, ........ आला जरी बोल. (विश्वाचा, समाजाचा, जगाचा)

**प्र.4. अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

1) 'नाही माझ्या घरट्यांत, चांदरातीचे मोहोळ
बालरवि-किरणांची, नाचे इथे प्रभावळ !'

2) 'अवघा निरसला शीण । देखतां संतचरण ।।
आजि दिवाळी दसरा । सेना म्हणे आले घरा ।।'

**प्र.4. आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

1) कवी ग.दि. माडगूळकर यांच्या मते, परमेश्वराचे दर्शन कोठे-कोठे घडते ?
2) पंढरीनाथाचा महिमा संत नरहरी सोनार यांनी कसा वर्णिला आहे?
3) माझ्या घरट्यात कोणत्या गोष्टी नाहीत, असे कवी म्हणतो ?
4) कवयित्रीने एकत्वाचे कोणते विचार कवितेतून व्यक्त केले आहेत ?
5) कवीच्या मनातील बेचैनीचे भाव केव्हा नाहीसे होतात ?

**प्र.5. खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

1) रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना काय केले पाहिजे असे लेखिकेला वाटते ?
2) 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते.' हे विधान पाठाच्या आधारे उदाहरणासह स्पष्ट करा.
3) स्वातंत्र्यचळवळीत कोणकोणती विधायक कामे केली गेली ?
4) जुईचे आईबाबा घरी कोणती कामे करतात?

**<u>किंवा</u>**

**खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

1) 'मुलांचे स्वप्न' या पाठाचा सारांश लिहा.
2) 'प्रतिसरकार' या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.6. अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

1) ते स्वता हाताने स्वंयपाक करून जेवत.
2) तिशऱ्या दिवशी बाबुजी गेले.

**प्र.6. आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

1) न्यायान्याय 2) सप्ताह 3) जिजालक्ष्मी 4) भाजीपाला

**प्र.6. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

1) शेणातला किडा शेणात राहत नाही. (प्रश्नार्थी करा.)
2) किती सुंदर बाग आहे ही ! (विधानार्थी करा.)
3) मुलांनी चांगला अभ्यास केला पाहिजे. (आज्ञार्थी करा.)

**प्र.6.** **ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(आनंदविभोर होणे, सोस असणे, हिरावून घेणे, क्षणभंगुर असणे, विध्वंस करणे, बेगमी करणे)

1) कोणाच्याही सणाचा आनंद हिसकावून घेणे योग्य नव्हे.

2) वृक्षतोड करून मानवाने निसर्गाचा नाश केला.

3) पावसाळा सुरू होणार म्हणून मुंग्यांनी खायच्या वस्तूंचा साठा केला.

4) मानवी जीवनातील सुख हे क्षणात नाहिसे होणारे आहे.

5) वनिताला इतरांना सहकार्य करण्याची खूप आवड आहे.

6) निसर्गाच्या सान्निध्यात मला खूप आनंद होतो.

**प्र.7.** **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **4**

ही शाळा तुमची, माझी, आपल्या सर्वांचीच आहे. ती सुंदर, स्वच्छ, प्रसन्न ठेवणे हे कुण्या एकाचे नव्हे, तर आपणा सर्वांचेच काम आहे. रोज प्रत्येकाने फक्त दहा मिनिटे जाणीवपूर्वक खर्च करून आपला वर्ग, व्हरांडा, आवार, बसण्याची जागा इत्यादी स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला, तर एकोप्याने केलेल्या कामामुळे शाळेची स्वच्छता नजरेत भरण्याइतकी छान होईल. शाळेच्या सौंदर्यात भर पडून वातावरण रम्य, प्रसन्न राहील. शाळेच्या स्वच्छतेची जबाबदारी काय फक्त सेवकांवर टाकायची? ते बिचारे दिवसभर राबले तरी त्यांचे हात, त्यांची शक्ती तोकडी पडेल. हाताच्या बोटावर मोजता येईल इतक्या माणसांनी सफाई करायची आणि इतर हजारो हातांनी मात्र घाण करायची, अस्वच्छता वाढवायची हे योग्य आहे काय? स्वच्छतेचा वसा घ्या. एकजुटीने कामाला लागा. तरच सुंदर, स्वच्छ शाळेचं स्वप्न सत्यात उतरेल.

**प्र.7.** **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** **4**

1) **मुद्दे :** दुपारची वेळ – सिंह जंगलात झोपलेला – उंदराचे अंगावर उड्या मारणे – सिंहाची झोपमोड होणे – हळूच पंजात पकडणे – दयेची याचना करणे – पुढे तोच सिंह शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकणे – सिंह गर्जना – त्याच उंदराचे धावून जाणे – दातांनी जाळे कुरतडणे – उपकराची फेड उपकारानेच – तात्पर्य.

2) **मुद्दे :** दोन मांजरी – लोण्याचा गोळा – त्याचे समान भाग याबद्दल वाद – झाडावरील माकडाचे येणे – तराजू आणणे – समान भाग करणे – दरवेळी एका पारड्यात जास्त – जास्तीचा भाग माकडाने खाणे – अखेरीस मांजरांना काही न मिळणे – माकडाचे पलायन – दोन मांजरांना शिकवण – तात्पर्य.

**प्र.7. इ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** **4**

1) आनंद / अनिता सावंत, विकास हायस्कूल, कन्नमवार नगर, पुणे, येथून शाळेच्या क्रिकेट स्पर्धेच्या उद्‌घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी प्रसिद्‌ध क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर, ए-५, इंद्रवदन सोसायटी, सेना भवन, दादर यांना निमंत्रित करणारे पत्र लिहित आहे. (लिफाफा आवश्यक)

2) स्मिता / संदेश चव्हाण, विद्यार्थी प्रतिनिधी, आदर्श विद्यालय, नवी पेठ, नागपूर येथून मा. व्यवस्थापक, सोलापूर साखर कारखाना, सहकार नगर, सोलापूर येथे पत्र लिहून कारखाना पाहण्याची अनुमती मागते/मागतो. (लिफाफा आवश्यक)

**<u>किंवा</u>**

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या शहरातील स्वच्छता अभियानाचा वृत्तांत लिहा.

**<u>किंवा</u>**

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

कॉम्प्युटर कोर्सची जाहिरात करा.

**प्र.8. खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

1) पृथ्वी बोलू लागली तर ...........
**मुद्‌दे** :- पृथ्वीचा जन्म - माणसाला उपयोग - माणसाची स्वार्थी व संकुचित वृत्ती - त्यामुळे पृथ्वीला वाटणारे दुःख - शेवट.

2) शेतकऱ्याचे आत्मवृत्त
**मुद्‌दे** :- नाव - गाव - शिक्षण - शेतीच्या कामाची लहानपणापासून सवय - कष्टमय जीवन - शेतीची अवस्था - रेडिओ, दूरदर्शन, वरील माहितीचा शेतीत उपयोग - नवीन शोध, आधुनिक उत्पादनाच्या पद्‌धती औषधे, बी, खते, साहित्य - नव्या पिढीचे विचार - शेतीकडे दुर्लक्ष - शेवट.

3) निसर्ग - माझा सोबती
**मुद्‌दे** :- मानव निसर्गाचा घटक – निसर्गाचे रक्षण प्रथम कर्तव्य – दुर्लक्ष केले तर पृथ्वीचा नाश – रक्षण केले तर मानव वाचेल – खऱ्या अर्थाने सोबती – जीवन आनंदी – निसर्ग वाचवा पृथ्वी वाचेल – पर्यावरण संतुलन – निसर्गाशी मैत्री टिकवा - शेवट.

**Best Of Luck** 👍

PAPER - II

# MT-162

2014 .... .... 1100

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM II - PAPER - II

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ. **1.** | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| 1) | आनंदवनाच्या निर्मितीआधी बाबांनी **वरोऱ्याला श्रमाश्रमाचा प्रयोग केला.** | **1** |
| 2) | न बापका डर, न माँका डर, **बेटा बना व्हॉलेन्टियर.** | **1** |
| 3) | एकाच्या पाठोपाठ दुसरं, तिसरं ... नजर पाहू शकेल एवढी **शिखरंच शिखरं !** | **1** |
| 4) | कारण माझा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच **मोठे ज्ञानी होतात.** | **1** |
| उ. **1.** | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| 1) | रविवर्मा त्या **तेजःपुंज** व्यक्तिमत्त्वाकडे भारल्यासारखा पाहत होता. | **1** |
| 2) | ते त्यांचं चालत आलेलं **शास्त्र** आहे. | **1** |
| 3) | बाबूजींसाठी कुणाकडेही **वेळ** नव्हता. | **1** |
| उ. **1.** | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | नारायण सुर्वे (मास्तर) यांनी मार्क्सवर श्रद्धा ठेवली. | **1** |
| 2) | पन्हाळ्याचा दरगाह आदिलशाह बादशहाने बांधला आहे. | **1** |
| 3) | लेखकाच्या मते निसर्गाला जाती तसेच धर्मही मंजूर नाहीत. | **1** |
| उ. **2.** | **अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील वाक्य 'संवाद, विसंवाद' या लेखिका 'शांता शेळके' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात संवादाच्या विविध प्रकारांबद्दल, त्यातील अडथळ्यांबाबत लेखिकेने माहिती दिली आहे.<br>**स्पष्टीकरण** : लेखिकेला मातृत्वाबद्दल अतिशय सुंदर अनुभव अनुभवायला मिळाला. त्याविषयी सांगताना लेखिका सांगते, अमेरिकन सुपरमार्केटमध्ये एक अमेरिकन तरूणी भेटली. बाबागाडीतली तिची छोटी मुलगी खूपच गोड होती. न राहवल्यामुळे लेखिकेने तिचे कौतुक केले व तिच्या आईलाही ते कौतुक फार आवडले. पुढे जवळजवळ घटकाभर मुलांविषयीच गप्पा मारत त्या दोघीही बसल्या. या गप्पांतून लेखिकेला जाणवले की मातृत्व जगामध्ये सर्वत्र समान असते.<br>**वैशिष्ट्य** : मातृत्वाचे लेखिकेने केलेले वर्णन येथे योग्य वाटते. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 2) | **संदर्भ** : वरील वाक्य 'परिवर्तनाचे उत्सव' या लेखिका 'विद्या बाळ' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात निसर्गातील ऋतुबदलानुसार जे उत्सव साजरे केले जातात त्यात काळानुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे हा विचार मांडला आहे.<br>**स्पष्टीकरण** : निसर्गातील ऋतुबदलानुसार आपण अनेक उत्सव मित्रमैत्रिणी व नातेवाईकांसोबत पारंपरिक पद्धतीने साजरे करत असतो. लेखिकेच्या मते आपण त्यात काळानुसार बदल करणे आवश्यक आहे. सर्व जातीधर्मांच्या, सर्व प्रकारच्या स्त्रीपुरूषांना सामावून घेऊन निसर्गाशी नाते जोडत आनंदाने हे उत्सव साजरे केले पाहिजेत. परंतु, यामध्ये कुणाकुणाला आपली स्वतःची ओळख हरवते असे वाटते. लेखिका याबाबतीत म्हणते की, हा सवयीचा आणि मनावरच्या वर्षानुवर्षांच्या संस्कारांचा परिणाम आहे. खरे तर स्वतःची ओळख प्रस्थापित करण्यासाठी केवळ लग्न, नवरा, जात, धर्म यांचाच आधार उपयुक्त नसतो. आपले विचार, आपले वागणे, आपल्याजवळचे एखादे कौशल्य, एखादी कला, एखाद्या कामाची बांधिलकी यामुळेही आपली ओळख स्पष्ट होत असते. लेखिकेच्या मते, सार्वजनिक जीवन जगताना आपण कुणाचे कुणीतरी नातेवाईक अशा ओळखीपेक्षा आपण 'अमुक अमुक' ही ओळख जास्त अर्थपूर्ण आणि महत्त्वाची ठरते.<br>**वैशिष्ट्य** : सार्वजनिक जीवनात स्वतःची स्वतंत्र ओळख असणे महत्त्वाचे आहे हा विचार येथे दिसून येतो. | **3** |
| उ.**2.** | **आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'मास्तर आणि मी' हा पाठ लेखिका 'कृष्णाबाई सुर्वे' यांनी लिहिला आहे. या पाठात सुप्रसिद्ध कवी नारायण सुर्वे यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे वर्णन केले आहे.<br>सन १९७३ ला सोव्हिएत रशियातर्फे 'सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार' मास्तरांना मिळाला होता. मास्तरांना मिळालेला हा पहिला आंतर्देशीय पुरस्कार होता. मास्तरांच्या कवितांमधून कम्युनिस्टांचे विचार व्यक्त होत असल्यामुळे तिथल्या मंडळींना मास्तर 'आपलाच' माणूस वाटत असणार म्हणून त्यांना हा सन्मान दिला होता. मास्तर परदेशात चालले याचे लेखिकेला खूप कौतुक वाटत होते.लेखिका शाळेतून रजा काढून मास्तरांना विमानतळावर पोहोचवायला गेल्या त्यावेळी त्यांना खूपच भरून आले. ज्या मार्क्सवर मास्तरांनी श्रद्धा ठेवली त्याच्याच देशात मास्तर चालले होते आणि ह्याच विचाराने त्यांचे मन पुन्हा एकदा भरून आले व आपल्या जीवनाचे सार्थक झाले, असेही त्यांना वाटले.<br>अशाप्रकारे सुर्वे यांना सोव्हिएत रशियाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल कृष्णाबाई वरील विचार व्यक्त करतात. | **3** |
| 2) | 'परिवर्तनाचे उत्सव' हा पाठ लेखिका 'विद्या बाळ' यांनी लिहिला आहे. या पाठात निसर्गातील ऋतू बदलानुसार जे उत्सव साजरे केले जातात त्यात काळानुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे, हा विचार मांडला आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| | आजकाल लग्नांच्या वराती, भाद्रपदातला पारंपरिक गणेशोत्सव, शिवाय माघातली गणेशजयंती, महाशिवरात्र, दिवाळी, नवरात्र असे उत्सव शहाण्या माणसाला वेड लागेल अशी परिस्थिती निर्माण करतात. अशावेळी असे आनंदोत्सव साजरे करताना ते उत्सव आवाज आणि गर्दी यामुळे त्रासदायक होणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. या गर्दीची रस्त्यावरच्या रहदारीला अजिबात अडचण होणार नाही इतके त्या समारंभाचे स्वरूप विकेंद्रित असायला हवे. या उत्सवाचे विकेंद्रीकरण करून आपापल्या घरात, अंगणात, सोसायटीत किंवा समाजमंदिरात ते साजरे केले पाहिजेत. पण तेथे या आनंदाची उधळमाधळ अजिबात होऊ नये, असे लेखिकेला वाटते.<br>अशाप्रकारे आनंदोत्सव साजरे करताना वरील मर्यादा आपण पाळणे आवश्यक आहे, असे लेखिकेला वाटते. | |
| 3) | <u>'उरूसाचे दिवस'</u> हा पाठ लेखिका <u>'आशा आपराद'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने पन्हाळगडावरील उरूसाच्या आठवणी सांगत बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविलेले आहे.<br>लेखिका आशा आपराद यांच्या घरात मुस्लीम म्हणून 'रमजान ईद' व 'बकरी ईद' अशा दोन ईद साजऱ्या केल्या जायच्या. यावेळी लेखिकेची मा खसखस, सुका मेवा, पेढे, गूळ, साखर, दूध आणि शेवया यापासून शिरखुर्मा तयार करायची. सुकं मटण, रस्सा, पुलाव असा स्वयंपाक असे. लेखिकेचे वडील गल्लीत प्रत्येकाच्या घरी जाऊन आमंत्रण देत आणि लेखिकेची आई सर्वांना अगत्यपूर्वक आग्रहानं वाढायची. लेखिकेच्या मैत्रिणी ईद दिवशी जेवायला, नंतर शिरखुर्मा संपेपर्यंत तो प्यायला दोन-तीन दिवस यायच्या. ईदला लहान मुलांना घरातील मोठी माणसे, नातेवाईक पैसे म्हणजे 'इद्दी' देतात. अशी 'इद्दी' कोणाजवळ जास्त जमते, अशी चढाओढ मुलांमध्ये असायची. नवीन कपडे, भरपूर सुट्टे पैसे अशी मुलांची मजा असे.<br>अशाप्रकारे ईद दिवशी आपराद यांच्या घरी आनंदाचे वातावरण असे. | **3** |
| 4) | <u>'निसर्गवेध'</u> हा पाठ लेखक <u>'बी. जी. वाघ'</u> यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने निसर्ग आपल्याला समृद्ध आणि आनंदी जगणे शिकवतो, हे दाखवून दिले आहे.<br>पहाटे सारा आसमंत नवलाईने फुलून आलेला होता. वाऱ्याच्या जोरदार झटकाऱ्यांनी झाडे आनंदविभोर झालेली वाटत होती. पावसाची एखादी सर झरझरून ओसरून गेली असल्यामुळे वरचे आभाळ अगदी स्वच्छ, निळेशार दिसत होते. पूर्ण चंद्र साऱ्या वैभवात नटलेला होता. घननिळ्या आभाळातले चांदणे मनाला भूल घालत होते. पहाटेच्या निःस्तब्ध शांततेमध्ये कोकिळेचा कुहूऽकुऽहू आवाज मनाला धुंद करीत होता. हे सारे क्षण जपून ठेवावे, असे लेखकाला वाटत होते. कारण ऋतुचक्रांचे विभ्रम पुन्हा पुन्हा बघायला मिळतात. परंतु हा ऋतू, हा दिवस, हे क्षण पुन्हा पुन्हा येणार नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे निसर्गाला जुनं सोसवत नाही. त्याला नित्य नव्याचा सोस असतो म्हणूनच तर सगळी झाडे दरवर्षी बहरतात.<br>अशाप्रकारे वरील अनुभवामुळेच निसर्गाला नित्य नव्याचा सोस असतो, असे म्हटले आहे. | **3** |

| | | |
|---|---|---|
| 5) | ‘काय राव पुस्तकराव !’ हा पाठ लेखक ‘दासू वैद्य’ यांनी लिहिला आहे. प्रस्तुत नाटिकेत लेखक आपल्या जीवनातील पुस्तकांचे महत्त्व सांगतात. तसेच पुस्तकांची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन करतात.<br>पुस्तकरावांनी प्रकट होण्याआधी मंदार व मानसी यांना डोळे झाकण्यास सांगितले. रंगमंचावर अंधार झाला. प्रकाशाची उघडझाप झाली व त्यांच्या प्रवेशाला पूरक असे संगीत वाजवले गेले. मग काही क्षणातच पुस्तकराव वेगळ्या पोशाखात रंगमंचावर आले.<br>रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावांनी पांढरे सैल कपडे घातले होते. या कपड्यांवर पुस्तकाच्या पानांप्रमाणे गणित, कविता, नकाशे, चित्र इत्यादी गोष्टी होत्या. डोक्यावर गमतीदार टोपी होती. एका पायाला प्लॅस्टरप्रमाणे कपडा गुंडाळलेला होता. डोळ्यांना गोल चष्मा होता.<br>अशाप्रकारे रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावांच्या पोशाखाचे लेखकाने वर्णन केले आहे. | 3 |
| उ.3. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| 1) | संत नरहरी सोनार ‘कृपा कर’ असे पंढरीनाथाला सांगतात. | 1 |
| 2) | कवयित्री आश्लेषा महाजन यांना जीवन दुर्मिळ, सुंदर वाटते. | 1 |
| 3) | वाऱ्यावरती बेचैनीचे भाव विरून जात आहेत. | 1 |
| उ.3. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| 1) | तिथे अन्न होऊन ठाकेल **श्याम**. | 1 |
| 2) | साऱ्या नद्यांचे **प्रवाह** बदलावेत. | 1 |
| 3) | सावरीत जखम खोल, **जगाचा** आला जरी बोल. | 1 |
| उ.4. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| 1) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती ‘माझ्या घरट्यात’ या कवितेतून घेतल्या आहेत. त्याचे कवी ‘सूर्यकांत खांडेकर’ आहेत. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा विचार मांडला आहे.<br>**स्पष्टीकरण** : नव्या आशा-आकांक्षांचे सौंदर्य स्पष्ट करताना कवी म्हणतो की, त्याच्या घरट्यात रात्रीच्या चंद्रप्रकाशाचे मोहोळ नाही. म्हणजेच येथे केवळ स्वप्नरंजकता नाही. तर नुकत्याच उगवणाऱ्या बालरवीच्या किरणांची प्रभावळ आहे. म्हणजेच ही स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे येथे आनंदाने नांदतात.<br>**वैशिष्ट्य** : येथे कवीचे वास्तववादी विचार दिसून येतात. | 3 |
| 2) | **संदर्भ** : वरील पद्यपंक्ती ‘आजि सोनियाचा दिवस’ या ‘संत सेना महाराज’ यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन या अभंगामध्ये केले आहे. | 3 |

<u>**स्पष्टीकरण**</u> : संतांच्या सहवासात खूप आनंद मिळतो. संत सान्निध्यात राहिल्यामुळे संत सेना महाराज यांच्या मनातील वाईट विचारांचा नाश झाला व मनाला शांतता लाभली. संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला आहे. दिवाळी-दसरा आल्यावर आनंदाला तोटा नसतो. घरी सुखाचे, समाधानाचे वातावरण असते. त्याचप्रमाणे संतांच्या भेटीमुळे सेना महाराज यांच्या मनाला दिवाळी-दसऱ्याप्रमाणे आनंद झाला आहे.
<u>**वैशिष्ट्य**</u> : येथे संत सेना महाराजांची आनंदी मनोवस्था दिसून येते.

उ.**4.** **आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.**

1) <u>'जिथे राबती हात'</u> ही कविता कवी <u>'ग.दि. माडगूळकर'</u> यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे. **3**

कवी ग. दि. माडगूळकर म्हणतात की, ज्या ठिकाणी माणसे कष्ट करतात, घाम गाळतात तेथे विविध रूपात परमेश्वर उभा राहतो. शेतकरी आपल्या शेतात खूप राबतात, मेहनत करतात. त्याठिकाणी अन्नाच्या रूपात परमेश्वर उभा राहतो. अशा शेतात परमेश्वराचे सावळे रूप दिसते. पाथरवट लोक रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना विविध आकार देतात. शिवाय विणकर लोक कापसापासून सुंदर कापड तयार करतात. अशा मेहनत करणाऱ्या लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो.

अशाप्रकारे कवीच्या मते, ज्या ठिकाणी कष्ट केले जातात, त्याठिकाणी परमेश्वराचे दर्शन घडते.

2) <u>'कृपा करी पंढरीनाथा'</u> हा अभंग <u>'संत नरहरी सोनार'</u> यांनी लिहिला आहे. या अभंगामध्ये भक्तांचा सांभाळ करणाऱ्या पंढरीच्या विठ्ठलाचा महिमा वर्णन केला आहे. **3**

पंढरपूरचा पंढरीनाथ भक्तांवर नेहमीच कृपा करणारा कृपावंत आहे. तो दीन-दुबळ्यांची, गरीबांची मदत करणारा दीनानाथ आहे. जीवन जगत असताना भक्तांच्या हातून कळत नकळतपणे अनेक चुका, अनेक अपराध घडतात. पांडुरंग अशा भक्तांच्या अपराधांना क्षमा करतो. तो भक्तांचा सांभाळ करतो. ज्यांना कोणाचाही आधार उरलेला नाही अशा अनाथांवर कृपा करणारा तो कृपाळू आहे. भक्तांकडून अनेकवेळा अन्यायकारक गोष्टी घडतात. इतरांवर खूप अन्याय केले जातात. अशा वेळी माफी मागितली तर विठ्ठल अशा अन्यायी भक्तांनाही माफ करतो. अशा या पंढरीनाथाचा महिमा खरंच खूप अगाध आहे, अमर्याद आहे. कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो समजत नाही.

अशाप्रकारे संत नरहरी सोनार यांनी पंढरीनाथाचा महिमा वर्णिला आहे.

3) <u>'माझ्या घरट्यात'</u> ही कविता कवी <u>'सूर्यकांत खांडेकर'</u> यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो. **3**

भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती महत्त्वाची असते. त्याबाबत कवी म्हणतो, त्याच्या घरट्यात म्हणजेच घरात हिऱ्यामाणकांची रास नाही. म्हणजेच त्याच्याकडे मौल्यवान वस्तू

| | | |
|---|---|---|
| | नाहीत. त्याच्या घरट्यात कल्पफुलांचा संभार म्हणजेच कल्पनेतील फुलांचा साठा नाही. कवीच्या घरात भौतिक ऐश्वर्य कुठेच दिसत नाही. त्याच्या घरी चांदरातीचे मोहोळ म्हणजेच केवळ स्वप्नरंजकता नाही. कवीच्या घरात एकतारी एकस्वर असल्यामुळे सातसुरांचा झंकार म्हणजेच वाद, संघर्ष दिसत नाही. शेवटी कवी म्हणतो की, त्याच्या घरात सुखासमाधानाचे वातावरण असल्यामुळे तेथे कधीही कोणाच्याही कपाळाला आठी दिसत नाही.<br>अशा या विविध गोष्टी कवीच्या घरट्यात नाहीत. | |
| 4) | 'एकत्वाचे गीत महान' ही कविता कवयित्री 'आश्लेषा महाजन' यांनी लिहिली आहे. या कवितेत आपल्या देशात विविधतेत एकता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>कवयित्रीने देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान मात्र एकच असते. त्याचप्रमाणे भारतातही आपल्याला विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा, पूजाअर्चा आणि वेशभूषा यामध्ये विविधता आहे. तरीही येथील लोकांच्या हृदयात वाहणारा प्राणवायू एकच आहे. हा प्राणवायुसुद्धा आपणास समतेची, एकतेची शिकवण देत आहे. उंचच उंच नेहमी फडकणारा तिरंगा ध्वज, लोकांच्या मनातील गंगेचे पावित्र्य आणि हिमनगाच्या उंच रांगा एकत्वाचा संदेश देतात. तसेच येथील चंद्र, सूर्य आणि मातीसुद्धा समानता शिकवतात.<br>अशाप्रकारे विविधतेतूनच एकत्वाचे अनेक विचार कवितेतून व्यक्त झाले आहेत. | **3** |
| 5) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>कवीचे गाव निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे. कवीला आपले गाव खूप खूप आवडते. परंतु असे असले तरी पोट भरण्यासाठी त्याला दूर शहरात जावे लागले. वीतभर पोटासाठी त्याला आपले लाडके गाव सोडावे लागले. त्यामुळे गावाच्या अनावर ओढीने त्याचे मन बेचैन होते, अस्वस्थ होते. अशा परिस्थितीमध्ये जेव्हा जेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर त्याचे गाव आठवणींच्या रूपात दिसू लागते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव निघून जातात. गावाच्या आठवणींमुळे त्याच्या मनाला शांतता, समाधान लाभते.<br>अशाप्रकारे जेव्हा कवीला त्याचे गाव आठवणीतून डोळ्यांसमोर दिसते तेव्हा त्याच्या मनातील बेचैनीचे भाव नाहीसे होतात. | **3** |
| उ.**5.** | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** | |
| 1) | 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जीवन जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे. | **4** |

लेखिकेला आपल्या नातवंडांबद्दल खूप प्रेम वाटते. तिला वाटते की, या मुलांना लाड करून घेण्याची, भरभरून प्रेम मिळण्याची सवय झाली आहे. सदैव आपली काळजी घेणारे कोणीतरी आहे हा विश्वास या मुलांना वाटतो. पण ही मुले जशी मोठी होतील तसे त्यांच्या लक्षात येईल की, या जगात वेगवेगळ्या वृत्तींची, स्वभावाची माणसे आहेत. घरात मिळणारे सौजन्यपूर्ण वातावरण बाहेरच्या जगात मिळणार नाही. हिंसा, अभिलाषा, मत्सर या अपप्रवृत्ती समाजात पसरलेल्या आहेत. दुर्दैवाने मुलांना शाळकरी वयात या गोष्टी शिकायला मिळत आहेत. लेखिकेला वाटते की, मुलांनी मोठे होता होता या शत्रूंना जिंकायला पाहिजे. त्यासाठी त्यांनी प्रत्येक दिवसाची सुरूवात प्रार्थनेने करावी. खेळ खेळताना एकत्र खेळावे. शिवाय कुणाविरूद्ध द्वेष ठेवू नये. जितक्या जास्तीत जास्त जणांना आनंद देता येईल तेवढा त्यांनी दिला पाहिजे. साऱ्या जगासाठी त्यांनी स्वतः आदर्श बनले पाहिजे.

अशाप्रकारे रेवन्त व अनाहिता यांनी या जगात वावरताना सर्वांशी प्रेमाने, आपुलकीने वागावे असे लेखिकेला वाटते.

2) 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे. **4**

प्रत्येक गावाची आपली एक संस्कृती असते. ती तेथील परंपरेमुळे निर्माण झालेली असते. हे समजावतांना लेखक म्हणतात की, पश्चिम महाराष्ट्राच्या एकाच पट्ट्यातील गावे एकसारखी नाहीत. त्यांची संस्कृती वेगळी आहे. कागल तालुक्यातील 'सागाव' हे पानमळ्याचे गाव म्हणून ओळखले जाते. 'सिद्धनेली' हे भात पिकविण्यासाठी प्रसिध्द आहे. 'कापशी' या गावातील सणगर समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात घोंगड्यांचे उत्पन्न काढतात. सातारा जिल्ह्यातील एक गाव शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. तेथील माणसे शिकून शिक्षक होण्याचा प्रथम प्रयत्न करत असतात. पुणेरी पगडी, पैठणचा शालू, जेजूरीचा भंडारा, पंढरपूरचा बुक्का, सोलापूरची चादर ही स्थानिक गावांची वैशिष्ट्ये आहेत. त्या त्या गावांच्या त्या त्या वस्तू प्रतिष्ठेच्या समजल्या जातात त्यामुळे ती त्यांची संस्कृती बनलेली दिसते.

दूधकट्ट्यावर सकाळच्या वेळी दुधाच्या धंद्यासाठी जाणाऱ्या म्हशी हे कोल्हापुरच्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे. त्याच सकाळच्या वेळी पहिलवानांचा समूहही दुधकट्ट्यावरील दूध पिऊन आखाड्यात मेहनत करतो. काही पैलवान पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. पंढरपूरच्या चंद्रभागा स्नानाला मात्र पावित्र्याचा स्पर्श आहे. दोन्ही गंगास्नानेच आहेत पण त्यामागची सांस्कृतिक भावना वेगळी आहे. पंढरपूरची संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. ती विठ्ठलाच्या मंदिराच्या केंद्राभोवती निर्माण झाली आहे. त्याचबरोबर लाल लाल मातीच्या रस्त्यांचे देखणेपण आणि मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची ओळख आहे.

अशाप्रकारे वरील उदाहरणामुळेच 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते' हे स्पष्ट होते.

3) 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे. **4**

गावा-गावांतील स्वातंत्र्यचळवळीच्या दृष्टीने विधायक कार्य करणाऱ्या लोकांना एकत्र आणून राष्ट्रीय आंदोलनाची वाढ कशी होईल याचा विचार केला जात होता. त्याचबरोबर वेगवेगळ्या तालुक्यांत अनेक गावांतून सभा व परिषदा घेतल्या जायच्या. तेथे शाहिरी व कवने म्हणणाऱ्या मुलांना प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. गावा-गावांत राष्ट्रीय आंदोलनाची वाढ व्हावी यासाठी राष्ट्रीय विचारांच्या व्यक्तींना आणून व्याख्याने आयोजित केली जात असत. खादी वापराचा प्रचार केला जात असे. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्याचे महत्त्व याकडे कटाक्षाने लक्ष दिले जायचे. रचनात्मक आदर्श समाज घडविण्यासाठी अनेक सामाजिक नीतिमुल्ये निर्माण केली. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना इत्यादी कार्यक्रम राबविले.

अशाप्रकारे स्वातंत्र्यचळवळीत विविध विधायक कामे करण्यामागे त्याग, बलिदान, राष्ट्रप्रेम व समाजहिताची तळमळ होती.

4) 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे. **4**

जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. खूप मुले-मुली त्यांच्याकडे शिकायला यायची. जुईची आई घरातली शक्य तितकी कामं करून वाचनालयात जाते. जुईचे बाबा जुईला जेवायला वाढतात आणि मग स्वतः जेवून भांडीही धुवून ठेवतात. जुई जेव्हा शाळेतून येते, तेव्हा जुईची आई भाजी, दळण घेऊन येत असते. ती यायच्या आधीच जुईचे बाबा मस्त चहा करतात आणि सगळे चहा पितात. जुईची आई पटकन चटमट खाऊ करते. नंतर बाबा क्लास घ्यायला तयार होतात. जुई खेळून आल्यावर जुईचे आई किंवा बाबा जुईचा अभ्यास घेतात. जुईची आई स्वयंपाक करते. बाबा ताटं घेतात. मग सगळे मिळून जेवतात.

अशाप्रकारे जुईचे आईबाबा एकमेकांच्या सहकार्याने घरातली सारी कामे करतात.

**किंवा**

| | | |
|---|---|---|
| 1) | **खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**<br>'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुई आणि चिनार ही शहाणी मुलं होती. त्यांच्या शेजारचे आपल्या मुलांना सांगायचे, 'बघा, बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.' खरंतर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनार आणि जुईला मात्र वाईट वाटायचे. चिनार आणि जुईचे आईबाबा काम करून खूप दमायचे. चिनारचे आई व बाबा दोघंही मिळून एक छोटं हॉटेल चालवायचे. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. चिनार आणि जुई या दोघांना वेळच मिळत नसल्यामुळे मनात इच्छा असूनसुद्धा दोघेही आईवडिलांना कामात मदत करू शकत नव्हते. तरीही लोकांनी त्यांना चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे वाटून त्यांना त्या गोष्टीचं वाईट वाटायचे.<br>एके रविवारी जुई आणि चिनार एकमेकांना भेटले. चालता चालता एक फूल टपकन चिनारच्या डोक्यात पडले. जुईनेही फुलांच्या सड्यावर नजर टाकली. दोघांच्या डोक्यात एकाचवेळी एक विचार आला. कोणतेही झाड असो, ते किती उपयोगी पडते. त्यामुळे कसंही करून आपण झाड व्हायचं आणि सगळ्यांना खूप मदत करायची. आपल्याला झाड बनवावे यासाठी जुई आणि चिनार भैरू जादूगाराला भेटले.<br>भैरू जादूगर या विचित्र मागणीने चक्रावला. भैरू जादूगाराने जुई आणि चिनारची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण चिनार, जुई आपल्या म्हणण्यावरून हटले नाही. शेवटी जादूगाराला कबूल करावे लागले. भैरू जादूगाराने चिनार आणि जुईला संमोहित केले. चिनार चिंचेचे झाड आणि जुई चाफ्याचे झाड झाली होती. पण झाड झाल्यावर त्यांना बोलता येत नव्हते, हलता येत नव्हते. शेवटी ज्याला जे अवयव मिळालेत त्यांनी त्यांचा उपयोग करून शक्य तितकी मदत एकमेकांना करावी हे चिनार आणि जुईला पटले. झाडे खोड, पानं, फुलं, फळं, मुळं या अवयवांचा उपयोग करून मदत करतात. तसेच आपण हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून जमेल ती मदत करायला हवी, असे चिनार आणि जुई यांच्या बालमनाला पटले. | **8** |
| 2) | 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे.<br>लेखक नागनाथअण्णा नायकवडी यांनी मॅट्रिकचे शिक्षण अर्धवट सोडून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लेखकाने सक्रिय सहभाग घेतला. तसेच क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारच्या स्थापनेत ते क्रियाशील सदस्य होते.<br>१९४२ साली मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरूद्ध 'चले जाव' आंदोलनाचा नारा दिला. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. | **8** |

अनेक ठिकाणी प्रचंड जमावांनी इंग्रज सत्तेविरूद्ध असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या गेल्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. मामलेदार कचेरीवर मोर्चे निघाले होते.

याच काळात देशात काही ठिकाणी इंग्रजांचा कायदा मानायचा नाही, स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करायचे या विचाराने 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'सातारा' येथे स्थापन झालेले 'प्रतिसरकार' दीर्घकाळ टिकले. प्रतिसरकारच्या कार्यकर्त्यांकडून गावागावात ऐक्य निर्माण करून मतभेद मिटविण्याचा प्रयत्न केला जात होता. गावांत शांतता नांदेल याकडे कटाक्षाने पाहिले जात होते. राष्ट्रप्रेमाने प्रेरित झालेल्या तरूणांना व गरीब आणि सत्प्रवृत्तीच्या लोकांना संघटित व्हायला प्रोत्साहन दिले जायचे. राष्ट्रीय आंदोलनात वाढ व्हावी म्हणून सभा परिषदा घेतल्या जायच्या. खादीचा प्रचार केला जायचा. सत्याग्रह, व्यसनमुक्ती, शारीरिक जोपासना, संघटित सामर्थ्य याकडे लक्ष दिले जायचे. सामाजिक नीतिमूल्ये निर्माण केली जायची. साक्षरताप्रसार, अस्पृश्यतानिवारण, स्त्री-पुरूष समानता, हुंडाबंदी, अंधश्रद्धा निमूर्लन, गांधी-विवाह पद्धती, ग्रामस्वच्छता, सामाजिक न्याय प्रस्थापना कार्यक्रम राबविले जायचे.

परंतु काही वाईट प्रवृत्तींच्या लोकांनी हे प्रतिसरकार बदनाम करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण प्रतिसरकारने या वाईट प्रवृत्तींच्या लोकांचा बंदोबस्त करण्यासाठी सुव्यवस्था, न्यायनिवाडा यांची कडक अंमलबजावणी केली.

| | | |
|---|---|---|
| उ.**6.** | अ) **खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| 1) | ते **स्वतः** हाताने **स्वयंपाक** करून जेवत. | **2** |
| 2) | **तिसऱ्या** दिवशी **बाबूजी** गेले. | **2** |
| उ.**6.** | आ) **खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| 1) | न्यायान्याय - न्याय किंवा अन्याय - वैकल्पिक द्वंद्व समास | **1** |
| 2) | सप्ताह - सात दिवसांचा सप्ताह - द्विगू समास | **1** |
| 3) | जिजालक्ष्मी - जिजा आणि लक्ष्मी - इतरेतर द्वंद्व समास | **1** |
| 4) | भाजीपाला - भाजी, पाला वगैरे - समाहार द्वंद्व समास | **1** |
| उ.**6.** | इ) **कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| 1) | शेणातला किडा शेणात राहतो का ? | **1** |
| 2) | ही बाग खूपच सुंदर आहे. | **1** |
| 3) | मुलांनो, चांगला अभ्यास करा. | **1** |

| | | |
|---|---|---|
| उ.6. | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| 1) | कोणाच्याही सणाचा आनंद हिरावून घेणे योग्य नव्हे. | **1** |
| 2) | वृक्षतोड करून मानवाने निसर्गाचा विध्वंस केला. | **1** |
| 3) | पावसाळा सुरू होणार म्हणून मुंग्यांनी खायच्या वस्तूंची बेगमी केली. | **1** |
| 4) | मानवी जीवनातील सुख हे क्षणभंगुर आहे. | **1** |
| 5) | वनिताला इतरांना सहकार्य करण्याचा सोस आहे. | **1** |
| 6) | निसर्गाच्या सानिध्यात मी आनंदविभोर होतो. | **1** |
| उ.7. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| 1) | शाळा कोणाची आहे ? | **1** |
| 2) | सुंदर, स्वच्छ शाळेचं स्वप्न केव्हा सत्यात उतरेल ? | **1** |
| 3) | रोज प्रत्येकाने किती मिनिटे शाळा स्वच्छ करण्यासाठी खर्च केली पाहिजे ? | **1** |
| 4) | शाळा स्वच्छ राखण्याची जबाबदारी कोणाकोणाची आहे ? | **1** |
| उ.7. | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 66 - Q.26 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 63 - Q.20 | **4** |
| उ.7. | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 90 - Q.05 | **4** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 96 - Q.11 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.7. | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No.104 - Q.12 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.7. | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 115 - Q.16 | **4** |
| उ.8. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| 1) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 31 - Q.28 | **10** |
| 2) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 48 - Q.43 | **10** |
| 3) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 19 - Q.17 | **10** |

❑❑❑❑❑